जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in





## -:प्रेस नोट :-

दिनांक ०६/०५/२०२६

## " जळगाव बसस्थानक परिसरात जेष्ठ नागरिकांची फसवणूक प्रकरणी 02 आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद "

दिनांक २०/०४/२०२६ रोजी दुपारी १४:३० वा. सु फिर्यादी नामे गजानन विठोबा सर्जेराव वय -६५ रा. जिल्हा बँक कॉलनी जळगाव असे जळगाव बसस्थानक येथे असतांना एक इसम फिर्यादी जवळ येवुन त्यांना शेगांव बस बाबत विचारणा करून बोलण्यास गुंतवुन त्याचे सोबत असलेल्या दुस-या साथीदारांस एक खडा आणण्यास सांगुन हातचालाखी करून सदर खडयाचा रूद्राक्ष केला होता व सदर फिर्यादी यांना बसस्थानकांतील कोप-यात नेवुन तुमचा शनिदोष काढुन देतो असे भुलथापा देवुन वयोवृध्द फिर्यादीच्या हातातील अंगठी व पैसे काढुन पसार झाले त्याबात फिर्यादीची फसवणुक झाल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादवरुन दोन अज्ञात इसमां विरूध्द फिर्यादी दिल्याने **जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे I ११७/२०२६, भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३१८(४), ३(५), प्रमाणे गुन्हा दाखल** करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेता **मा.पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी** श्री. राहुल गायकवाड, वरिष्ट पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना सदर गुन्हयांचा समातंर तपास करुन तात्काळ गुन्हा उघडकीस आणणेकामी सुचना देवुन मार्गदर्शन केले. त्यानुशंगाने श्री. राहुल गायकवाड, वरिष्ट पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वेग-वेगळे पथके तयार करुन त्यांना सदर गुन्हाचा समांतर तपास करुन गुन्हा तात्काळ उघडकीस आणणे बाबत योग्य त्या सुचना देवुन आदेशित केले.

तयार करण्यात आलेल्या पथकाकडुन तांत्रीक विश्लेषण आणि परिसरातील CCTV फुटेजची सखोल पडताळणी करीत असतांनाच सदर गुन्हयांतील संशयीत आरोपी हे नगरदेवळा ता. पाचोरा येथे असले बाबत गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली बातमीदारा कडुन मिळालेल्या माहितीची पडताळणी करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी नगरदेवळा ता.पाचोरा येथुन **गुन्हयांतील संशयीत आरोपी नामे १)अल्ताफ हसन मदारी वय-३२रा.निपाणी रोड, वखार जवळ नगरदेवळा ता. पाचोरा. जि जळगाव २)मोहसीन जब्बार मदारी वय-३१ रा.झोपडपट्टी पाण्याचे टाकीजवळ नागद रोड चाळीसगांव ता. चाळीसगांव जि.जळगांव** यांना ताब्यात घेवुन गुन्हयांसंबधीत चौकशी कामी स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव येथे आणुन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. व त्याचे सोबत त्यांचा साथीदार **सद्दाम मदारी** हा देखिल सदर गुन्हयांत सामिल असल्याचे सांगीतल्याने, त्याचा देखिल शोध सुरू आहे. नमुद आरोपीतांना गुन्हयांचा पुढील तपासकामी जिल्हापेठ पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री.श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री. संदिप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगांव यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप-निरीक्षक शरद बागल, सफौ./अतुल वंजारी, पोहेकॉ/ विजय पाटील . अकरम शेख, नितीन बाविस्कर, प्रविण भालेराव, मुरलीधर धनगर, पो.ना./किशोर पाटील, पो.अ. /राहुल रगडे, रविंद्र कापडणे, प्रदीप सपकाळे ,मिलींद जाधव गौरव पाटील तसेच पाचोरा पो.स्टे चे पोकॅ I/ दिनेश पाटील व जळगाव RPF चे अंमलदार पंकज वाघ तसेच नेत्रम चे अंमलदार मुबारक देशमुख, पंकज खडसे, कुंदनसिंग वयास या पथकाने उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव



११ रेकार्ड रुम
रेकॉर्ड रुम
स्थानिक गुन्हे शाखा